# सायबर सुरक्षा जागरूकतेसाठी करार

**सायबर सुरक्षा** जागरूकतेसाठी महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेची के. बी. जोशी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, क्विक हिल फाऊंडेशन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. क्विक हिल फाऊंडेशनच्या अनुपमा काटकर, अजय शिर्के, गायत्री केसकर, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनघा वैद्य, मनाली सपकाळ या वेळी उपस्थित होत्या. कराराअंतर्गत महाविद्यालयात 'क्विक हील सायबर अवेअरनेस क्लब' स्थापन करण्यात येणार आहे. त्यासाठी ज्ञानदा सुर्वे, क्षितिजा देवणे, यशश्री परब, कृतिका रिसबूड या विद्यार्थिनींची पदाधिकारी म्हणून निवड करण्यात आली.